MHPA020019222022

## निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मुंबई विनिमय कायदयामधील कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन आहे की, विठ्ठलराव पिता सिताराम पत्की यांचा मृत्यू दिनांक ०९.०५.२०२१ रोजी दत्त नगर, कारेगांव रोड, परभणी येथे झालेला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदारांना कायदेशीर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, सबब, त्यांचे नावे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

३. प्रस्तुत प्रकरणात दैनिक देशोन्नती वर्तमानपत्रात जाहीरनामा प्रकाशित करुनही प्रकरणामध्ये कोणीही हजर झाले नाही तसेच कोणाचीही हरकत आलेली नाही.

४. प्रस्तुत प्रकरणात खालील मुद्दे माझ्यासमोर उपस्थित होत असुन, त्यावरील निष्कर्ष मी त्याखाली नोंदविलेल्या कारणांसाठी देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे विनंती केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| २ | काय आदेश ? | अंतीम आदेशानुसार. |

### कारणमिमांसा

५. **मुद्दा क्र. १ करीता :-**

अर्जदारांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज हा मुंबई विनिमय

कायदा कलम २ नुसार दाखल केलेला आहे. अर्जदाराचे कथन आहे की, विठ्ठलराव पिता सिताराम पत्की यांचा मृत्यू दिनांक ०९.०५.२०२१ रोजी दत्त नगर, कारेगांव रोड, परभणी येथे झालेला आहे त्यांना अर्जदार हेच वारस आहेत. कार्यालयीन कामासाठी त्यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब, वारस प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जदार क्र. ०२ अभिजीत पिता विठ्ठलराव पत्की यांनी त्याच्या व अर्जदार क्र. १ यांच्या म्हणण्यास पुष्टी देणे कामी त्यांचा पुरावा निशाणी १० दाखल केला. सदरील साक्षीदाराने शपथेवर सांगितले की, विठ्ठलराव पिता सिताराम पत्की यांना अर्जदार हेच वारस असुन, ईतर कोणीही वारस नाही. त्यांनी सदरील शपथेवर सांगितलेली बाब ही खोटी आहे असे म्हणण्यासाठी अभिलेखावर काहीही आलेले नाही. तसेच मयत विठ्ठलराव पिता सिताराम पत्की यांचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत निशाणी ११ आणि अर्जदारांच्या आधार कार्डांच्या प्रमाणित प्रती अनुक्रमे निशाणी क्र.१२ व १३ वर दाखल केले आहेत. प्रकरणामध्ये जाहीरनामा निशाणी १४ हा वर्तमानपत्रात प्रकाशित करुनही कोणीही हरकती कामी हजर झाले नाही, अथवा कोणाचीही हरकत आलेली नाही. सबब, अर्जदारांनी दाखल केलेला पुरावा अबाधित राहिलेला आहे. सबब, अर्जदार हे मयत विठ्ठलराव पिता सिताराम पत्की यांचे वारस दिसत असल्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरतात. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

६. **मुद्दा क्र. २ करीता :-**

वरील मुद्दा क्र. १ वर नोंदविलेल्या कारणांवरुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ व २ हे मयत विठ्ठलराव पिता सिताराम पत्की यांचे कायदेशीर वारस असल्याचे ठरवण्यात येत आहे. त्या संबंधीचे प्रमाणपत्र योग्य ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्या नंतर देण्यात यावे.

Digitally signed by ANIL BABURAO SHENDGE
Date: 2022.11.19 10:47:01 +0530

दिनांकः १८.११.२०२२

(अनिल बा. शेंडगे)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
परभणी.